नि.फौ.ख. क्रमांक.०८/२०२३
सरकार विरुध्द परमेश्वर व इतर
निशाणी क्रमांक – ४४.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – परशुराम बालाजी सुरनर,
वय -३० वर्षे, धंदा - शेती,
रा. रुध्दा, ता.अहमदपूर, जि.लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.शिंदे</u>**

**०१.** अहमदपुर पोलिसांनी मला दि.१५/१२/२०२२ रोजी रुध्दा पाटी येथे बोलाविले होते. पोलिसांनी त्याठिकाणी माझी पंचनाम्यावर सही घेतली. पोलिसांनी माझयासमक्ष कोणताही पंचनामा केला नव्हता. कोणतीही वस्तु जप्त केली नव्हती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराची मला माहिती नाही. साक्षीदाराने सही मान्य केल्याने सहीपुरते **<u>नि.क्र.४५</u>** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोगपक्षास मदत करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदार हा सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दि.१५/१२/२०२२ रोजी पोलिसांनी मला व हनुमंत याला फिर्यादीचे शेत गट क्र.१२८ मध्ये पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी माझे समक्ष पंचनामा करण्यात आला, तो मला वाचून दाखविण्यात आला, त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी माझेसमक्ष खोरे जप्त करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ओळखीचा असल्याने खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

<u>आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.सोनकांबळे यांच्यामार्फत सुरु</u>:-

**०३.** उलटतपास नाकारला.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक -२९.०१.२०२६